## थोडक्यात

### अल्पवयीन युवतीचा विनयभंग

**शिक्रापूर :** चव्हाणवाडी ता. शिरुर येथील अल्पवयीन युवती शाळेत तसेच शिकवणीला जात असताना गावातील सागर बांदल हा वारंवार युवतीचा पाठलाग करुन युवतीशी बोलण्याचा प्रयत्न करत युवतीशी असभ्य वर्तन करत असे, युवती शिकवणीला जात असताना सागर याने युवतीला थांबवून युवतीच्या मनास लज्जा निर्माण होईल असे वर्तन केले, याबाबत पिडीत युवतीने शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी सागर संजय बांदल रा. चव्हाणवाडी ता. शिरुर जि. पुणे याच्या विरुद्ध विनयभंग तसेच बाललैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहे

### स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकासाठी १५ लाख मंजूर : प्रेमसुख कटारया

**दौंड :** दौंड येथील नियोजित स्वातंत्र्यवीर स्मारका साठी दौंडचे आमदार राहुल कुल यांनी १५ लाख रुपय निधी मंजूर केले असून हे काम लवकरच मार्गी लागेल. असे मत दौंडचे माजी नगराध्यक्ष प्रेमसुख कटारिया यांनी दौंड येथे कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले आहे.

दौंड येथे स्वातंत्र्यवीर स्मारक स मिती च्या वतीने सावरकर जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी बोलताना कटारिया पुढे म्हणाले, आचार संहिता सम्पल्यावर स्मारक उभारण्यास गती देण्यात येईल. लोक.सहभाग आणी शासनाच्या माध्यमातून सदर काम पूर्णतःवास नेण्यात येईल.

यावेळी बोलताना नगरसेवक इंद्रजीत जगदाळे म्हणाले, पुढील वर्षी होणारा सावरकर जयंती कार्यक्रम स्मारका त पहायला मिळेल.


कार्यक्रमा पूर्वी स्वा. सावरकर प्रतिमेचे पूजन दौंड नगर पालिकेचे मुख्याधिकारी विद्या पोळ आणी उपस्थित मान्यवर यांनी केले.

याप्रसंगी आप्पासाहेब पवार, स्वप्नील.शहा,अनिल सोमवणे, ऍड, राजेंद्र बोडके, ऍड, सुधीर.गटणे, ऍड,सचिन. साने, विवेक गटणे, अर्चना साने, नरसिह

नाड गौडा, विकास देशपांडे, शामराव वाघमारे, रामश्वर मंत्री, धीरज ग्राम पुरोहित या मान्यवर यांचेसह. नागरिक.उपस्थित होते. विकास देशपांडे.यांनी.आभार मानले.

# समतेच्या व बंधुभावाच्या विचारांची नव्याने गरज !

पिंपरीत पुण्यश्लोक अहिल्यादेवीच्या जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण



**पिंपरी / प्रतिनिधी**

येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवीच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसमोरील पुतळ्यास मराठा सेवा संघाच्या वतीने ॲड. लक्ष्मण रानवडे यांनी पुष्पहार अर्पण करून संघाच्या वतीने अभिवादन केले.

या वेळी मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते व अध्यक्ष ॲड. लक्ष्मण रानवडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव सुरेश इंगळे , मा. राघव होजगे , जमील शेख, ज्येष्ठ कार्यकर्ते राजू आवळे व इतर नागरिक उपस्थित होते.

मध्य प्रदेश सारख्या भाषिक राज्यात जाऊन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी समतेचा व बंधुभावाचा विचार सर्व जाती पंथांमध्ये आपापसातील वैर विसरून तेथील जनतेच्या आचरणात उतरविला असून याचा आदर्श महाराष्ट्रातील विविध जाती पंथांनी घेण्याची नितांत गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती शाहू , क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि डॉ.आंबेडकर यांसारख्या महापुरुषांच्या महाराष्ट्रात जाती-जातींमध्ये असंतोष पसरता कामा नये, असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष ॲड. लक्ष्मण रानवडे यांनी आज येथे केले. या वेळी ॲड. लक्ष्मण रानवडे पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात कधी नव्हे ते आरक्षणाच्या मुद्द्यावरून शेकडो वर्ष एकोप्याने राहणारे समाज एकमेकांविरुद्ध उभे ठाकल्याचे पाहून दुःख होते. त्यामुळे साहजिकच अहिल्यादेवीची शिकवण व त्यांचा आदर्श व कार्य डोळ्यासमोर उभे राहते, असे त्यांनी नमूद केले.

## कर्नाटक सेक्स रॅकेटमधील आरोपी अखेर अटक

**पुणे :** कर्नाटक सेक्स रॅकेटमधील आरोपी जेडीएस नेता प्रज्वल रेवण्णा याला अखेर विशेष तपास पथकाने अटक केली आहे. निलंबित खासदार प्रज्वल रेवण्णा जर्मनीहून ३५ दिवसानंतर बंगळूरमध्ये दाखल होताच विमानतळावर त्याला अटक करण्यात आली.

प्रज्वल याला अटक केल्यानंतर विशेष पथकाने त्याला सीआयडी कार्यालयात नेले. रात्रभर त्याला तिथेच ठेवण्यात आले.

प्रज्वल रेवन्ना याला आज (शुक्रवारी) वैद्यकीय चाचणीसाठी सरकारी रुग्णालयात नेण्यात येणार असून त्यानंतर न्यायालयात हजर करून एसआयटीकडून त्याची कोठडी मागण्यात येणार आहे. त्याला किमान १४ दिवसांची पोलीस कोठडी मिळावी यासाठी एसआयटी प्रयत्न करणार असल्याचे समजते.

प्रज्वलच्या विरोधात आतापर्यंत लैंगिक छळाचे तीन गुन्हे दाखल आहेत . या आठवड्यात त्याने एक व्हिडिओ संदेश जारी केला होता. ३१ मे रोजी एसआयटीसमोर हजर राहण्याचे आणि तपासात सहकार्य करणार असल्याचे त्यात त्याने सांगितले होते.

कर्नाटकात लैंगिक शोषणाचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर प्रज्वल एप्रिलमध्ये देश सोडून पळून गेला होता. त्यानंतर एसआयटीच्या विनंतीवरून इंटरपोलने प्रज्वल याच्या विरोधात 'ब्लू कॉर्नर' नोटीस जारी केली.

## ब्रांडेड लोगो वापरून बनावट कपड्यांची विक्री

**पिंपरी :** ब्रांडेड लोगो वापरून बनावट कपड्यांची विक्री केल्याप्रकरणी पिंपरी येथे तीन दुकानदारांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये पोलिसांनी १० लाख ३१ हजार ४०० रुपये किमतीचे कपडे जप्त केले आहेत. ही कारवाई गुरुवारी (दि. ३०) दुपारी करण्यात आली.

महेश कांबळे (वय ४१, रा. शिवाजीनगर, पुणे) यांनी याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संजय चंद्रकांत भोजवानी (वय २९, रा. काळेवाडी), संजू दिलीप बसंतानी (वय २४, रा. पिंपरी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी मार्केट मध्ये दोन दुकानदारांनी त्यांच्या दुकानात ब्रांडेड कंपन्यांचे लोगो लाऊन बनावट कपडे विक्रीसाठी ठेवले असल्याची माहिती कंपनीला मिळाली. त्यानुसार कंपनीने पिंपरी पोलिसांना माहिती देत पोलिसांच्या मदतीने गुरुवारी दुपारी साई चौकातील शिव गारमेंट्स आणि संजय ट्रेडलिंक येथे कारवाई केली.

## रिसॉर्टमध्ये अश्लील नृत्य;१७ तरूण,११ तरूणी पोलिसांच्या ताब्यात

ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील घटना

**ओतूर / प्रतिनिधी**

ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत पुणे ग्रामीण पोलिसांनी ओतूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील डिंगोरे गावच्या परिसरातील माळशेज ऍग्रो टुरिझम व फार्म या रिसॉर्टमध्ये सुरू असलेल्या अश्लील नृत्यांच्या कार्यक्रमावर

पुणे ग्रामीण पोलीस व ओतूर पोलीसांनी छापा टाकुण केलेल्या कारवाईत रिसॉर्ट मॅनेजरसह १७ तरूण आणि ११ तरूणींना ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक एल.जी.थाटे यांनी दिली.

याबाबत दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विशाल शिवाजी गव्हाणे यांनी ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

या फिर्यादीवरून ओतूर पोलिसांनी १) राधाकिसन झनकर वय ४४ वर्ष,२) रविंद्र लाड वय ४७ वर्ष,३) योगेश वाघ वय ४६ वर्ष,४) अक्षय थोरात वय २६ वर्ष ,५) अतुल जगताप वय २६ वर्ष,६) भाउसाहेब गाडे वय ३८ वर्ष ,७) शाम चव्हाण वय ४३ वर्ष,८) अमोल शिंदे वय ३२ वर्ष,९) संपत धात्रक वय ४२ वर्ष,१०) योगेश सांगळे वय ३७ वर्ष,११) सागर उगले वय ३२ वर्ष,१२) किशोर सानप वय ३३ वर्ष,१३) शिवाजी हराळे वय ४५ वर्ष,१४) तन्मय बकरे वय २५ वर्ष,१५) शरद सानप वय ३४ वर्ष,१६) सागर कर्नावत वय ३३ वर्ष/१७) सागर जेजुरकर वय ३५ वर्ष सर्व राहणार नाशिक जिल्हा व त्यांच्यासोबत इतर ११ तरूणी तसेच माळशेज ऍग्रो टुरिझम व फार्म या रिसॉर्टचे मालक प्रदिप चंद्रकात डहाळे व हॉटेल मॅनेजर ३०) अविनाश अशोक भोगे वय २९ रा. करवंडी ता.जि. अहमदनगर यांच्यावर गुन्हा दाखल करून,आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,दि.३० मे रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास डिंगोरे गावच्या हद्दीत माळशेज ऍग्रो टुरिझम व फार्म या रिसॉर्ट मध्ये यातील आरोपी मजकूर पैकी ११ महिला यांनी उत्तान कपड्यांमध्ये संगीताच्या तालावर तेथील १७ पुरूषांसमोर उभ्या राहून विभत्स हावभाव करून, त्यांना आकर्षित करीत,अश्लीलरीत्या नृत्य करताना मिळवून आले तसेच यातील रिसॉर्टचे मालक व मॅनेजर यांनी कोणत्याही ग्राहकाची रजिस्टर मध्ये नोंद न करता हॉल उपलब्ध करून प्रोत्साहन दिले म्हणून यातील आरोपींवर ओतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे थाटे यांनी सांगितले.

सदरची कारवाई पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे,जुन्नरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी शाखा पुणे ग्रामीणचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्जुन मोहिते, ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एल.जी.थाटे यांनी केली.

## हिंजवडी पोलिसांकडून हद्दीतील पब आणि बारची झाडाझडती

**पिंपरी :** पुण्यातील पोर्शे कार अपघातानंतर पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. हद्दीतील बार, पब आणि संबंधित ठिकाणांची सातत्याने पाहणी होत असून अनुचित प्रकार आढळल्यास त्यावर पोलीस कारवाई करत आहेत. पिंपरी-चिंचवड पोलीस देखील हद्दीतील पब आणि बारवर निगराणी ठेऊन आहेत. दरम्यान, गुरुवारी (दि. ३०) हिंजवडी पोलिसांनी अचानक हद्दीतील पब आणि बारची झाडाझडती घेत सर्व बाबी नियमानुसार चालत आहेत का, याची पडताळणी केली.

हिंजवडी आयटी पार्कमुळे आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पब, बार आणि हॉटेल्स आहेत. आयटी मध्ये काम करणारा नोकरवर्ग आजूबाजूच्या परिसरात वास्तव्यास असल्याने इथल्या पब, बार आणि हॉटेल्स मध्ये मोठी गर्दी असते. पुणे शहरात झालेल्या पोर्शे कार अपघा तानंतर हेच पब आणि बार प्रशासकीय यंत्रणेच्या निशाण्यावर आले आहेत. मद्य खरेदी करणे, मद्य प्राशन करणे, मद्याची वाहतूक करणे यासाठी शासनाच्या नियमावली आहेत. त्यानुसारच संबंधित ग्राहकांना मद्य देण्याचा नियम आहे.

पुण्यातील प्रकरणानंतर पोलीस सतर्क झाले आहेत. हिंजवडी पोलिसांनी गुरुवारी रात्री हद्दीतील पब आणि बार मध्ये अचानक भेटी दिल्या. स्वतः हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मोठ्या फौजफाट्यासह पबमध्ये जाऊन पाहणी केली.

पबमध्ये अल्पवयीन मुलांना प्रवेश दिला जात आहे का, पब आणि बारमध्ये अल्पवयीन मुले आहेत का, प्रत्येक ग्राहकाची नोंदणी करण्यात येते का, पबमध्ये पुरेशी सुरक्षा व्यवस्था आहे का, मद्य सोडून इतर अंमली पदार्थांचे येथे सेवन केले जाते का, याबाबत पाहणी केली. त्यानंतर पोलिसांनी संबंधित पब, बार आणि हॉटेल चालकांना सुरक्षेसंदर्भात सूचना दिल्या.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात म्हणाले, गुरुवारी रात्री हिंजवडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पब आणि बारची पाहणी केली. पब आणि बारचे लायसन्स, आवश्यक असणाऱ्या विविध परवानग्या आहेत का, याची माहिती घेतली. अल्पवयीन मुलांना मद्य दिले जात नसल्याची खात्री केली. तसेच सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन, पब आणि बार चालकांना विविध सूचना करण्यात आल्या. या पुढेही सातत्याने पब आणि बारची पाहणी सुरू राहणार आहे.

## बेकायदेशीर गॅस रिफिलिंग प्रकरणी जागा मालकासह तिघांवर गुन्हा

**रावेत :** बेकायदेशीर गॅस रिफिलिंग प्रकरणी पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने कोयते वस्ती, पुनावळे येथे कारवाई केली. यामध्ये जागा मालकासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहम्मद जाहिद मकबूल शेख (वय १९, रा. पुनावळे. मूळ रा. बिहार), जसिम आसीम शेख (रा. पुनावळे. मूळ रा. बिहार), जागा मालक हनुमंत रानवडे (रा. कोयते वस्ती, पुनावळे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार सुनील शिरसाट यांनी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपी मोहम्मद शेख आणि जसिम शेख हे कामगार असून त्यांनी बेकायदेशीरपणे गॅस रिफिलिंग केली. याबाबत त्यांनी कोणतीही सुरक्षेची खबरदारी घेतली नाही.

## इनामगावात जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

इनामगाव ता. शिरुर येथील सिद्धेश्वर मंदिराजवळ सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने कारवाई करत छापा टाकून जुगार खेळणाऱ्या नऊ जणांना ताब्यात घेत तब्बल पंच्याहत्तर हजार रुपयांचा ऐवज जप्त केल्याची घटना घडली असल्याने नाऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इनामगाव ता. शिरुर येथील सिद्धेश्वर मंदिराजवळ काही इसम पत्त्यांच्या सहाय्याने जुगार खेळत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला मिळाली, त्यांनतर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार संजू जाधव, जनार्दन शेळके, राजू मोमीन यांसह आदींनी सदर ठिकाणी जाऊन ओअहनि केली असता काही इसम गोल रिंग करुन बसून मध्यभागी पत्ते व पैसे टाकून जुगार खेळत असल्याचे दिसले, दरम्यान पोलिसांनी त्यांना जागेवर पकडत त्यांच्या जवळील जुगाराचे साहित्य तसेच रोख रक्कम व आदी साहित्य जप्त केले.

याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार संजू ज्ञानदेव जाधव रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी गणेश पोपट कोऱ्हाळे वय ४३ वर्षे, सखाराम दादा भालेराव वय ५४ वर्षे, भारत बाबुराव गवळी वय ५५ वर्षे, बाबा छबन भालेराव वय ४८ वर्षे, रामदास पाटीलबुवा मचाले वय ४५ वर्षे, बाळासाहेब दिगंबर तनपुरे वय ५८ वर्षे, आजिनाथ एकनाथ विटेकर वय ५३ वर्षे सर्व रा. इनामगाव ता. शिरुर जि. पुणे, सतीश उत्तम फलके वय ४८ वर्षे रा. पिंपळसुटी ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास फाकटे पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक राहुल भवर हे करत आहे.


एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पूणे

L&T Finance

### तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई–लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई–लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह–कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 30.05.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. विक्रांत ओव्हल 2. रेखा ओव्हल | मालमत्तेचा प्रत्येक आणि सर्व भाग, पत्ता: अपार्टमेंट/युनिट नं.2207 चटई क्षेत्रफळ 53.47 चौरस मीटर्स म्हणजे 575.55 चौरस फीट ज्यासोबत एनक्लोज्ड बाल्कनी आहे जिचे क्षेत्रफळ 7.23 चौरस मीटर्स म्हणजे 77.82 चौरस फीट आहे ज्यासोबत 2.44 चौरस मीटर्स म्हणजे 26.26 चौरस फीटांची ड्राय बाल्कनी/वॉश एरिया आहे, ज्याला 6.54 चौरस मीटर्स म्हणजे 70.4 चौरस फीट टेरेसचा भाग संलग्न आहे, जो 22 व्या मजल्यावर विंग नं. सी आणि एक कव्हर्ड कार पार्किंग असून प्रकल्पाचे नाव ''पेबल्स हाय मॉंट फेज-i'' ज्याचं बांधकाम सर्वे नं. 277, प्लॉट नं. 2 मोजमाप 02 H 11.75 भाग आणि सर्वे नं.277, प्लॉट नं.3 जो मान गाव, तालुका–मुळशी, जिल्हा–पुणे येथे असून मान गावाच्या ग्राम पंचायतीच्या हद्दीत येतो आणि सब रजिस्ट्रारच्या अधिकारक्षेत्रात, हवेली, पुणे येथे आहे. | H141233009201045 53 आणि H141233009201045 53L | 2 मे 2024 | रु. 5,54,240 | रु. 64,56,480.59 | रु. 55,42,400 | आधी अपॉइंटमेंट घेऊन कामकाजाच्या सर्व दिवशी | 10.07.2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5:30 |

#### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **09/07/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही..
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **10/07/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **11/07/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव – अशोक लबाडे, संपर्क क्रमांक 9637764444, ऑफिस: एल&टी फायनान्स लि. – ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. – ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई–लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई–लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 01.06.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/–
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड


# देवीच्या मंदिरातून चांदीचा मुखवटा चोरीला

**निरगुडसर / प्रतिनिधी**

भराडी ता. आंबेगाव येथील गावचे ग्रामदैवत असलेल्या भराड माऊली देवीच्या मंदिरात चोरी झाली असून देवीचा अंदाजे साडे तीन लाख रूपये किंमतीचा साडेसात किलो पेक्षा जास्त वजनाचा चांदीचा मुखवटा, व १० हजार रुपये किमतीचे देवीचे दोन ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र चोरीला गेला आहे.

याबाबत पारगाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली असून चोरट्याचा शोध सुरू आहे. याबाबत मंदिराचे पुजारी विश्वनाथ गोसावी यांनी पारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. याबाबत सविस्तर



माहिती अशी की दिनांक ३१ रोजी पहाटे देवीचे पुजारी ( ब्राम्हण काका) हे मंदिरातील पूजा करण्यासाठी उठले असता त्यांना देवीच्या मंदिराची कुलपे उघडलेली दिसली त्यावेळी त्यांनी मंदिरात जाऊन पाहिले असता त्यांना देवीचा मुखवटा दिसला नाही. त्यांनी तात्काळ याबाबत गावचे पोलीस पाटील संतोष खिलारी, ग्रामस्थ रमेश खिलारी, किसन गावडे यांना माहिती दिली त्यांनी मंदिरात येऊन पाहिले असता देवीचा मुखवटा दिसला नाही. याबाबत ग्रामस्थांनी तात्काळ पारगाव पोलिसांना माहिती दिली असता पारगाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली तसेच श्वान पथक पाचारण करून चोरट्याचा माग घेण्यात आला आहे. याबाबत पारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील चार ते पाच दिवसात चोरट्याचा शोध घेऊन देवीचा मुखवटा शोधून द्यावा अशी मागणी भराडी ग्रामस्थांनी केली आहे. पुढील तपास पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com